वर्ष : ०५ अंक: २४ मुंबई, मंगळवार ७ मे २०१९ ते १३ मे २०१९ पृष्ठ: ४

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION NO. PLG/205/2019-2021

WeWite: www.policebatmipatra.com
www.policebatmipatra.in

# पोलीस बातमी पत्र

संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक | कार्यकारी संपादक:- गुरुप्रसाद दिपक नाईक

PG 2 मराठा आरक्षणप्रश्नी राज्य सरकार सर्वोच्च न्यायालयात जाणार

3 → साठा आणि वाटा

मुंबईला जुलैपर्यंत पुरेल इतके पाणी ← 4



## Mumbai Coastal Road

# अखेर सुप्रीम कोर्टाचा बीएमसीला हिरवा कंदील

मुंबई - सागरी किनारा मार्ग (कोस्टल रोड) प्रकल्पासाठी समुद्रात टाकण्यात येणाऱ्या भरावाच्या कामासह इतर कामांस दिलेली स्थगिती सर्वोच्च न्यायालयाने उठवली आहे. त्यामुळे मागील अनेक दिवसांपासून अडकून पडलेले कोस्टल रोडचे काम मुंबई महापालिकेला पुन्हा सुरु करता येणार आहे. २३ एप्रिल रोजी कोस्टल रोड प्रकल्पासाठी समुद्रात टाकण्यात येणाऱ्या भरावाच्या कामासह इतर कामांस दिलेली स्थगिती उठवण्यास उच्च न्यायालयाने स्पष्ट शब्दांत नकार दिला होता. या निर्णयाविरोधात पालिकेने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. याच सुनावणीमध्ये सर्वोच्च न्यालयाने समुद्रात भर न टाकण्याच्या अटीवर महापालिकेला या कामासाठी हिरवा कंदील दिला आहे.

## पावसाळ्याआधी महापालिकेला काम सुरु करता येणार

सर्वोच्च न्यायालयातील खंडपीठाने दिलेल्या निर्णयामध्ये कोस्टल रोडचे बांधकाम करण्यास कोणत्याही प्रकारची हरकत नसल्याचे मत नोंदवले आहे. या प्रकल्पाविरोधातील इतर सुनावण्या जून महिन्यामध्ये होणार आहेत त्यामुळे पालिकेला बांधकाम सुरु करायचे असल्यास त्यांनी स्वत:च्या जबाबदारीवर ते सुरु करावे असेही न्यालयाने म्हटले आहे. हे बांधकाम थांबवून ठेवणे हे जनहिताच्या दृष्टीने योग्य नसल्याचे सांगत सर्वोच्च न्यालयाने पालिकेला पावसाळ्याच्याआधीच बांधकाम सुरु करण्याची परवाणगी दिली आहे.

मुंबई महापालिकेने न्यालयात दाखल केलेल्या अर्जामध्ये, 'मुंबईतील वाढत्या वाहतूककोंडीवर मुंबई कोस्टल रोड (दक्षिण) चांगला उपाय असून नागरीकांना सामना कराव्या लागणाऱ्या वाहतूक समस्या हाताळण्यासाठी अपुऱ्या पायाभूत सुविधांवरील समस्येवर हा कोस्टल रोड चांगला पर्याय आहे,' असं म्हटलं आहे. २३ एप्रिल रोजी उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयामध्ये या प्रकल्पाबद्दल नाराजी व्यक्त केली होती. प्रकल्पासाठी समुद्रात भराव टाकण्याचे काम तूर्त करू नये,

उर्वरित पृष्ठ 2 वर




## नोटाबंदीत तीन ते पाच लाख कोटींचा गैरव्यवहार झाला

**लोकसभा निवडणुकीच्या रणधुमाळीत सगळेच नेते एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करत आहेत. अशातच**



**नोटाबंदीवरून योगगुरू रामदेव बाबांनी मोदी सरकारवर निशाना साधत नोटाबंदीत तीन ते पाच लाख कोटींचा गैरव्यवहार झाल्याचा आरोप केला आहे.**

एका मुलाखतीत त्यांनी बँकेवाले किती बेईमान असतील, याचा विचार पंतप्रधान मोदींनी कधीही केला नसेल. त्यामुळे मला आता असे वाटते, की बँकवाल्यांनी नोटाबंदीच्या काळात लाखो कोटींची लूट केली. हा गैरव्यवहार सुमारे तीन ते पाच लाख कोटींचा असण्याची शक्यता आहे असं विधान केलं आहे. पुढे बोलताना त्यांनी नोटाबंदीच्या काळात रोख रकमेची कमतरता नव्हती. मात्र, ही संपूर्ण रोख रक्कम बेईमान लोकांना सोपविण्यात आली होती असा आरोप सरकारवर केला आहे.

दरम्यान नोटबंदीच्या काळात त्यांनी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या अधिकाऱ्यांच्या कामकाजावरही रामदेव बाबांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

## शंभर टक्के अनुदान मिळणाऱ्या शाळा व महाविद्यालयेच 'अनुदानित' - उच्च न्यायालय



**मुंबई - ज्या खासगी शाळांना व महाविद्यालयांना राज्य सरकारकडून १०० टक्के अनुदान मिळत आहे, त्याच शाळा व महाविद्यालयांचा उल्लेख अनुदानित शाळा किंवा महाविद्यालये असा करता येईल. तसेच त्याच शाळांचे व महाविद्यालयांचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सरकारकडून सेवानिवृत्ती वेतनाचा लाभ मागू शकतात, असा महत्त्वाचा निर्वाळा मुंबई उच्च न्यायालयाच्या पूर्ण खंडपीठाने दिला.**

ज्या शाळा व महाविद्यालयांना १ नोव्हेंबर २००५ पूर्वी सरकारकडून १०० टक्के अनुदान मिळत होते, त्याच शाळा व महाविद्यालयांच्या शिक्षकांना व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सरकारच्या जुन्या सेवानिवृत्ती योजनेचा लाभ मिळू शकतो, असेही न्या. एस. सी. धर्माधिकारी, न्या. अकिल कुरेशी व नितीन सांबरे यांच्या पूर्ण खंडपीठाने स्पष्ट केले.

राज्य सरकारने ३१ ऑक्टोबर २००५ रोजी 'डिफाईन कॉन्ट्रीब्युटरी स्कीम' (डीसीपी) चा निर्णय घेतला. या योजनेअंतर्गत राज्य सरकारच्या कर्मचाऱ्यांना व खासगी अनुदानित शाळा, महाविद्यालयांच्या शिक्षकांना व शिक्षकेतर कर्मचा-यांना, मात्र १

उर्वरित पृष्ठ 2 वर

### सरकारी वकिलांचा युक्तिवाद

तर सरकारी वकिलांनी याचिकाकर्त्यांचा युक्तिवाद फेटाळला. ज्या शाळांना १ नोव्हेंबर २००५ पूर्वीच १०० टक्के अनुदान मिळत होते, अशा शाळांनाच अनुदानित शाळा, असे समजून त्याच शाळांतील १ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्ती झालेल्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना जुन्या सेवानिवृत्ती योजनेचा लाभ मिळू शकतो, असा युक्तिवाद सरकारी वकिलांनी केला.

### न्यायालय म्हणाले...

सरकारी वकिलांचा युक्तिवाद ग्राह्य धरत न्यायालयाने म्हटले की, ज्या खासगी शाळांना व महाविद्यालयांना राज्य सरकारकडून १०० टक्के अनुदान मिळत आहे, त्याच शाळा व महाविद्यालयांचा उल्लेख अनुदानित शाळा किंवा महाविद्यालये असा करता येईल आणि त्याच शाळांचे व महाविद्यालयांचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सरकारकडून सेवानिवृत्ती वेतनाचा लाभ मागू शकतात.

## मतदानादरम्यान इव्हीएम मशीन फोडले, एकाला अटक

**पटना** – लोकसभा निवडणूकीच्या ५ व्या टप्प्यातील मतदानाला आज सुरुवात झाली आहे. दरम्यान बिहारच्या सारण लोकसभा मतदारसंघात मात्र या मतदानाला गालबोट लागलं आहे. सोनपूर विधानसभेच्या नयागावातील १३१ नंबरच्या मतदान केंद्रावर ईव्हीएम मशीन फोडण्यात आल्याचा प्रकार घडला आहे. त्यामुळे एकच गोंधळ उडाला आहे. याप्रकरणी पोलिसांनी एकाला अटक केली आहे. रणजित पासवान असे अटक केलेल्या व्यक्तीचे नाव आहे.

सकाळी मतदानप्रक्रिया सुरु झाल्यानंतर सारण लोकसभा मतदासंघातील सोनपूर विधानसभा मतदारसंघातील नयागावमधील बुथ क्रमांक १३१ वर मतदान प्रक्रिया सुरु होती. त्यावेळी ईव्हीएम मशीन फोडल्याचा प्रकार समोर आला आहे. त्यानंतर मतदान केंद्रावर



एकच खळबळ उडाली होती. पोलिसांनी मतदान केंद्रावर इव्हीएम फोडल्याप्रकरणी रणजित पासवान याला अटक केली आहे. तर मतदान प्रक्रिया थांबविण्यात आली होती.

बिहारमधील पाच मतदारसंघांमध्ये आज पाचव्या टप्प्यात मतदानप्रक्रिया पार पडणार आहे. त्यामुळे मतदान केंद्रावरील मतदान प्रक्रिया थांबविण्यात आली होती. सारण मतदारसंघातून महागठबंधनच्या उमेदवार चंद्रिका राय आहेत. तर एनडीएकडून राजीव प्रताप रुडी हे रिंगणात आहेत.

## सोशल राईट्स फाउंडेशन, अंधेरी विलेपार्ले सहार कमिटीची कार्यकारीणी जाहीर



दिनांक ४ मे २०१९ रोजी सोशल राईट्स फाऊंडेशनचे संस्थापक श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांच्या अध्यक्षतेखाली अंधेरी विलेपाले सहार कमिटी ची कार्यकारीणी जाहीर करण्यात आली. सामाजिक अधिकार मिळवून देण्यास व सामाजिक अधिकाराची बांधीलकी जपणाऱ्या अशा कार्यकर्त्यांची एक सभा भाईंदर (पूर्व) येथील संस्थेच्या मुख्य कार्यालयात घेण्यात आली. या कार्यकारणीमध्ये अध्यक्ष श्री. मुकेश जाधव, कार्यकारी अध्यक्ष श्री.सुरेश परबते व सौ.जुली कैलाश शिंदे, उपाध्यक्ष श्री. अशोक धोत्रे, श्री. महेंद्र जाधव, सचिव श्री. शैलेश जठार, सल्लागार सोनल मिशाळ, सह सचिव श्री. अजय कांबळे, श्री. वैभव लोके, श्री. संतोष केसरकर, श्री. सुनिल सिंह, खजिनदार श्री. हर्षेश कदम, कार्यकारी सचिव श्री.रोहीत साळूंखे, श्री. मंगेश गावंकर, श्री पारस पटेल, सौ. मिना गेद्दाम, सदस्य भारती रेगो, श्री. सचिन दुधवडे, श्री. प्रकाश परबते यांची नेमणूक करण्यात आली.

## 'राफेलमधल्या दलालीच्या पैशातून मोदी आमदार विकत घेतायत'

**नवी दिल्ली** – लोकसभा निवडणूक २०१९च्या पाचव्या टप्प्याचं मतदान सुरू आहे. त्याचदरम्यान सहाव्या आणि सातव्या टप्प्यासाठी राजकीय नेत्यांचा प्रचार सुरू आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या आजच्या प. बंगाल आणि झारखंडमध्ये निवडणूक प्रचारानं रंगत आणली आहे. अरविंद केजरीवाल यांनीही प्रचारादरम्यान मोदींवर गंभीर आरोप केले आहेत. नोटाबंदी हा देशातील स्वातंत्र्यानंतरचा सर्वात मोठा घोटाळा आहे. जर व्यापाऱ्यांनी भाजपाला मतदान केलं तर सीलिंग सुरूच राहणार



आहे. पण 'आप'ला मतदान केल्यास सीलिंग थांबू शकतं, असंही केजरीवाल म्हणाले आहेत. मोदींनी राफेलमधून बक्कळ पैसा कमावला, त्याच पैशानं आता मोदी आमदार विकत घेत आहेत.

दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी सोमवारी पत्रकार परिषद घेऊन मोदींवर गंभीर आरोप केले आहेत. आज देशात टॅक्स टेररिज्म पसरला आहे. त्यामुळे देशात भीती आहे. मोदी सांगतायत की, दहशतवाद्यांना आम्ही घरात घुसून मारलं, पण पाकिस्तानवाल्यांना पुन्हा मोदीच पंतप्रधान व्हावेत, असं वाटतंय. मोदींचे पाकिस्तानबरोबर गहन संबंध आहेत. मग ते राष्ट्रवादी कसे ठरतील, असंही केजरीवाल म्हणाले आहेत.

## बँकेत जायचा वेळ वाचवा, ATMमधून करू शकता ८ महत्त्वाची कामं

**मुंबई - लोक जास्त करून ATMचा उपयोग पैसे काढण्यासाठीच करतात. फार फार तर आपला अकाउंट बॅलन्स किती आहे, ते तपासण्यासाठी करतात. पण आता बँक ATMमधून आपल्या ग्राहकांना अनेक सेवाही देतेय. ज्यासाठी तुम्हाला बँकांमध्ये तासोनतास उभं राहावं लागायचं, ते आता तुम्हाला ATMमधून लगेच मिळू शकतं.**

**१. फिक्स्ड डिपॉझिटची सुविधा** : तुम्ही ATMमधून FD म्हणजेच फिक्स्ड डिपॉझिट करू शकता. तुम्हाला मेन्यूमध्ये दिलेल्या स्टेप्सप्रमाणे जायचंय. त्यात तुम्हाला डिपॉझिटचा काळ, रक्कम निवडल्यानंतर कन्फर्म करायचा ऑप्शन निवडावा लागेल.

**२. कर भरणं** : देशातल्या अनेक मोठ्या बँका एटीएमद्वारे अन्कम टॅक्स भरण्याची सुविधा देतायत. यात ॲडव्हान्स टॅक्स, सेल्फ असेसमेंट टॅक्स आणि रेग्युलर असेसमेंटनंतर दिला जाणारा कर यांचा समावेश आहे.

**३. ATMमध्ये पैसे जमा करू शकता**



: मोठ्या सरकारी बँका आणि खासगी बँका यांनी एटीएममध्ये कॅश डिपॉझिट मशीन ठेवलीय. यात तुम्ही ४९,९०० रुपये जमा करू शकता. या मशीन्समध्ये २०००, ५००,

उर्वरित पृष्ठ 2 वर

## 'शादी डॉट कॉम'वरील तरुणींच्या 'प्रोफाइल'चा गैरवापर

**मुंबई-** 'शादी डॉट कॉम' या प्रसिद्ध संकेतस्थळावरील तरुणींची वैयक्तिक माहिती वापरून आक्षेपार्ह मजकूर असलेल्या चित्रफिती यूटट्यूबवर प्रसारित केल्या जात आहेत. यावरून ऑनलाइन नोंदणीद्वारे विवाह संस्थांचे काम करणारी संकेतस्थळे विवाहोच्छुक तरुण-तरुणींसाठी सुरक्षित नाहीत



हेच दिसून येत आहे. काही यूटट्यूब वाहिन्यांवर 'शादी डॉट कॉम'वरील तरुणींची माहिती छायाचित्रासह दाखवली जात आहे. त्यात आक्षेपार्ह, अश्लील आणि अश्लाघ्य वाक्यांचा वापर करण्यात आला आहे. या चित्रफितींच्या बाजूला लिहिलेल्या या वाक्यांमधून यूटट्यूब वापरकर्त्यांचे अधिकाधिक लक्ष वेधून घेतले जात आहे. सुरुवातीला 'शादी डॉट कॉम'चा लोगो यात वापरला जात होता. सामाजिक कार्यकर्ते बिमल त्रिवेदी यांनी वारंवार ग्राहक सेवा क्रमांकावर तक्रार केल्यानंतर या चित्रफिती यूटट्यूबवरून काढून टाकण्यात आल्या. मात्र त्यानंतरही अशा प्रकारचे मजकूर असलेल्या आणि 'शादी डॉट कॉम'चे प्रोफाइल वापरलेल्या चित्रफिती प्रसारित केल्या जात आहेत. विवाह संस्थांचे काम करणाऱ्या संकेतस्थळावर नोंदणी केलेली व्यक्तीच त्यावरील तरुण-तरुणींची माहिती पाहू शकते. यावरून चित्रफिती प्रसारित करणारी व्यक्ती या संकेतस्थळाची नोंदणीकृत सदस्य असल्याचा अंदाज आहे. ज्या मुलींच्या छायाचित्रांचा गैरवापर करण्यात आला आहे, त्यांनाही याची माहिती नसावी, असे आढळून आले आहे. मुलगी आवडली असल्यास कमेंट बॉक्समध्ये कमेंट करून इच्छुकांनी आपली माहिती द्यावी. त्यानंतर चोवीस तासांच्या आत त्यांच्याशी वाहिनीकडून संपर्क साधला जाईल, असे या चित्रफितीमध्ये सांगण्यात येत आहे. तरुणींचे छायाचित्र, शिक्षण, कौटुंबिक पार्श्वभूमी, उत्पन्न, इत्यादी माहिती दाखवली जात आहे. त्याबरोबरच आक्षेपार्ह टिप्पणी चित्रफितींमध्ये केलेली पाहायला मिळते. तरुणींची छायाचित्रे आणि माहिती अशा प्रकारे विवाहनोंद संकेतस्थळांकडून गैरमार्गाने वापरली जात असेल, तर त्यावर नियंत्रण कसे होईल, हा नवा प्रश्न निर्माण झाला आहे. 'असा प्रकार प्रथमच घडला असून याबाबत संबंधित विभागाकडे माहिती पाठवली आहे. लवकरच या चित्रफिती हटवण्याची सूचना यूटट्यूबला केली जाईल,' असे आश्वासन 'शादी डॉट कॉम'च्या शायनी मिरांडा यांनी दिले आहे.

## मराठा आरक्षणप्रश्नी राज्य सरकार सर्वोच्च न्यायालयात जाणार

**मुंबई-** मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने वैद्यकीय पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी यंदाच्या शैक्षणिक सत्रात मराठा आरक्षण लागू होणार नाही असा निकाल दिला आहे. त्यास स्थगिती मिळविण्यासाठी राज्य सरकार गुरूवारी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करणार आहे.

वैद्यकीय शिक्षणाच्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया प्रवेश सुरु केली तरी त्याची अंमलबजावणी ही आरक्षणाचा कायदा लागू झाल्यानंतर सुरू झाल्यामुळे नागपूर खंडपीठाच्या निकालाला स्थगिती देण्याची मागणी राज्य शासन सर्वोच्च न्यायालयात याचिकेद्वारे करणार आहे. तसेच सध्या आचारसंहिता असल्यामुळे कायद्यात दुरुस्ती शक्य नसल्याने आचारसंहिता संपताच कायद्यात बदल करण्यासाठी अध्यादेश काढणार असल्याचे चंद्रकांत पाटील यांनी स्पष्ट केले.

महसूल मंत्री आणि मराठा आरक्षण विषयक मंत्रीमंडळ उपसमितीचे अध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी ही माहिती देताना मंत्रालयात पत्रकारांना सांगितले की, मराठा समाजाला दिलेल्या १६ टक्के आरक्षणाला हा निर्णय लागू असणार नाही. त्यामुळे या आरक्षणानुसार




नोकरी व शिक्षणातील प्रवेश प्रक्रिया सुरूच राहील.

पाटील म्हणाले, राज्य शासनाने मराठा समाजाला नोकरी व शिक्षणात १६ टक्के आरक्षण देण्याचा कायदा केला. त्यासंबंधीच्या याचिकेवर मुंबई उच्च न्यायालयात कायदेशीर प्रक्रिया सुरू आहे. मात्र, उच्च न्यायालयाने या कायद्याला स्थगिती दिली नाही. तसेच याविषयी निकाल लागेपर्यंत या कायद्यानुसार नोकरी व शिक्षणात आरक्षण देण्याची प्रक्रिया राबविण्यास सांगितले. त्याप्रमाणे राज्यात कार्यवाही सुरू आहे.


**नागपूर खंडपीठाचा निकाल**

१६ टक्के आरक्षणानुसार वैद्यकीय पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सुरु झाली होती. त्याविरुद्ध काही जणांनी सर्वोच्च तसेच मुंबई व नागपूर उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने हा विषय उच्च न्यायालयाच्या अखत्यारित येत असल्याचे सांगून याचिका फेटाळली होती. तर मुंबई उच्च न्यायालयाने सुट्टीनंतर यावर विचार करणार असल्याचे सांगितले. याच विषयावर नागपूर खंडपीठात एक महिना सुनावणी झाली. या कालावधीत कोणतीही स्थगिती न मिळाल्यामुळे वैद्यकीय पदव्युत्तर पदवी प्रवेश प्रक्रिया सुरू होऊन प्रवेशाच्या तीन याद्याही प्रसिद्ध झाल्या होत्या.

## आठ वर्षांत क्षयरोग रुग्णालयातील २४ रुग्णांनी केल्या आत्महत्या

**मुंबई-** बऱ्याचदा क्षयरोग बरा होण्यास प्रदीर्घ कालावधी लागतो. या कालावधीत काही रुग्ण अर्ध्यावर उपचार सोडून येतात. यादरम्यान काही रुग्णांना नैराश्य, एकटेपणा येतो. या काळात रुग्णांना अशा स्थितीला सामोरे जाणे कठीण होते. शिवडी क्षयरोग रुग्णालयात गेल्या आठ वर्षांत २४ रुग्णांनी क्षयरोगामुळे आलेल्या नैराश्य आणि एकटेपणातून आत्महत्येचा मार्ग स्वीकारल्याचे समोर आले आहे.

क्षयरोगावर उपचारांसाठी मुंबईतील शिवडी रुग्णालय हे प्रमुख रुग्णालय मानले जाते. शिवडी क्षयरोग रुग्णालय प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, २०१० ते २०१८ या कालावधीत २४ रुग्णांनी आत्महत्या केली आहे. या आत्महत्या रोखण्यासाठी रुग्णांचे अधिकाधिक समुपदेशन होणे गरजेचे असल्याचे मत वैद्यकीय तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे. याविषयी मानसोपचारतज्ज्ञ नूतन शहा म्हणाल्या की, क्षयरोगाच्या




उपचारांसाठी मोठा कालावधी लागतो. अशा वेळेस या कालावधीमुळे रुग्णांना शारीरिक आणि मानसिक चढ-उतार सहन करावे लागतात. रुग्णांना अशा स्थितीत कुटुंब- नातेवाइकांचा पाठिंबा, योग्य उपचार, समुपदेशन लागते. आजारातून बाहेर पडण्यासाठी ज्याप्रमाणे औषधोपचार अत्यावश्यक असतात त्याचप्रमाणे मानसिक पाठबळही गरजेचे असते. मात्र ते कमी पडले की केवळ क्षयरोग रुग्ण नव्हेच तर कुणीही कोलमडते. त्यामुळे नैराश्याची लक्षणे वेळीच ओळखून त्या व्यक्तीला समुपदेशन करणे हा यावर उपाय असल्याचे मानसोपचारतज्ज्ञ डॉ. नरेश पांडा यांनी सांगितले. शिवडी क्षयरोग रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. ललितकुमार आनंदे यांनी सांगितले की, गेल्या काही वर्षांचा आढावा पाहता आता रुग्णांच्या आत्महत्येचे प्रमाण कमी झाले आहे. २०१२-१३ साली प्रत्येक वर्षी पाच रुग्णांच्या आत्महत्यांची नोंद आहे. मात्र मागील दोन वर्षांत प्रत्येकी एकाच रुग्णाने आत्महत्या केल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे आता समुपदेशनाच्या साहाय्याने हे प्रमाण कमी झाले आहे.

## गणेशभक्तांकडून चार महिने आधीच कोकणरेल्वे फुल्ल

**मुंबई-** गणेशत्सवानिमित्त कोकणात जाणाऱ्या काही नियमित गाडय़ांचे आरक्षण काही तासांत फुल्ल झाले. यंदा २ सप्टेंबरपासून गणेशोत्सवाला सुरूवात होत असून २९ ऑगस्टच्या सीएसएमटी-मडगाव कोकणकन्या एक्सप्रेसमधील स्लीपर श्रेणीची प्रतिक्षा यादीचे तिकीट आरक्षण बुधवारी फुल्ल झाले. त्यामुळे प्रवाशांना या गाडीच्या स्लीपरचे आरक्षण उपलब्ध होऊ शकले नाही. तेजस एक्सप्रेस सोडता कोकण मार्गावरील अन्य गाडय़ांचे आरक्षण फुल्ल होत आहे. त्यामुळे गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्यांना यंदाही मोठय़ा प्रतिक्षा यादीचा सामना करावा लागणार आहे. दरवर्षी गणेशोत्सवासाठी मुंबईतून मोठय़ा संख्येने दोन ते तीन दिवस आधीच गणेशभक्त कोकणात जातात. कुटूंबियासह जाताना प्रवास सुकर व्हावा यासाठी नियमित गाडय़ांचे काही महिने आधीच आरक्षण करतात. परंतु आरक्षणाला सुरूवात होताच मोठय़ा प्रतिक्षा यादीचा सामना करावा लागतो. सिटींग, स्लीपर श्रेणीत प्रतिक्षा यादी असतानाही त्यात अनेक प्रवासी आपल्या कुटूंबियांसह उभ्याने प्रवास करतात. त्यामुळे दिलासा देण्यासाठी रेल्वेकडून नियमित गाडय़ांबरोबरच विशेष गाडय़ादेखील सोडल्या जातात. परंतु त्यातही प्रतिक्षा यादीच येते.

## दहिसर नदीलगतचा सर्वात मोठा तबेला विरारला स्थलांतरित

**मुंबई- दहिसर नदीलगत असलेल्या तबेल्यांमुळे नदीला नाल्याचे स्वरूप आले होते. परंतु आता दहिसर नदीला पुनरुज्जीवित करण्यासाठीच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. कारण या नदीलगत असणाऱ्या २२ पैकी सर्वात मोठा असलेला गोल्डन डेरी फार्म हा तबेला मुंबईबाहेर विरार येथे स्थलांतरित करण्यात आला आहे. तर उर्वरित तबेल्यांचे लवकरच स्थलांतरण होणार आहे. यामुळे महापालिकेच्या कारवाईला आणि रिव्हर मार्चच्या प्रयत्नांना यश आले आहे.**

बोरीवली पूर्वेकडील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाजवळून वाहणाऱ्या दहिसर नदीलगत २२ तबेले आहेत. यातील स्थलांतरित करण्यात आलेला गोल्डन डेरी फार्म या तबेल्यातील सुमारे १५० गाई-गुरे विरारला हलविण्यात आली आहेत. दहिसर नदीमध्ये मिसळणारे जनावरांचे मलमूत्र आणि मृत जनावरांविषयीचा मुद्दा उपस्थित झाल्यावर महापालिकेच्या आर/मध्य विभागाने या तबेल्यांवर कारवाईचा बडगा उगारला. त्यामुळे आता येथील २२ तबेले काही महिन्यांत मुंबईबाहेर जाण्याची शक्यता पर्यावरणप्रेमींनी वर्तवली आहे. महापालिकेने गेल्या महिन्यात तबेल्यांचे छप्पर तोडल्यानंतर गाई-म्हशींना उन्हात उभे राहावे लागत होते. तसेच या तबेल्यांना पालिकेकडून वारंवार नोटीस बजावणे, गाई-म्हशी ताब्यात



घेणे अशी कारवाई केली जात होती. परिणामी, गोल्डन डेरी फार्मच्या मालकानेच आपला तबेला मुंबईबाहेर स्थलांतरित केला आहे.

गोल्डन डेरी फार्मच्या १५० गाई-म्हशी विरारला नेण्यात आल्या आहेत, तर इतर तबेल्यांचे पाच मालक दहिसरमधून जाण्याच्या मार्गावर आहेत. तबेल्यातील जनावरांचे मलमूत्र व मृत जनावरे नदीत सोडली जातात. त्यामुळे नदी दूषित होत होती. परंतु महापालिकेच्या कारवाईनंतर तबेले स्थलांतरित होत असून ही एक चांगली बाब आहे.

## धारावी पुनर्विकास प्रकल्प निविदा प्रक्रिया रद्द होणार?

**मुंबई-** धारावी झोपडपट्टीचा पुनर्विकास करण्याच्या राज्य शासनाच्या प्रयत्नांना पुन्हा खीळ बसण्याची शक्यता आहे. या प्रकल्पासाठी जागतिक पातळीवरील निविदा प्रक्रियेत दुबईस्थित 'सेकलिंक लि.' ही कंपनी सरस ठरलेली असतानाही तांत्रिक मुद्दय़ावरून निविदा रद्द करण्यात येणार असल्याचे कळते.

५९३ एकरवर पसरलेल्या धारावी झोपडपट्टीचा संपूर्ण कायापालट करण्यासाठी राज्य शासनाकडून २००४ पासून प्रयत्न सुरु आहेत. धारावीचे पाच भाग करून त्यापैकी एक भाग म्हाडाला विकसित करण्यासाठी देण्यात आला. उर्वरित चार भागांसाठी विद्यमान भाजप सरकारने २०१६ मध्ये जागतिक पातळीवर निविदा जारी केल्या. एकाही विकासकाने प्रतिसाद न दिल्याने निविदा रद्द करावी लागली. शासनाने भरघोस सवलती देऊनही विकासकांनी त्यात रस घेतला नाही. त्यानंतर अलीकडे धारावीचा एकात्मिक पुनर्विकास करण्यासाठी राज्य शासनाने 'विशेष हेतु कंपनी' स्थापन करीत सवलतींची खैरात केली. जागतिक पातळीवर निविदा काढताना मूळ किंमत ३१५० कोटी इतकी ठरविण्यात आली. या निविदेसाठी सेकलिंकने ७२०० कोटी तर अदानी रिएल्टीने ४५०० कोटींची निविदा भरली. त्यामुळे अर्थातच सेकलिंकची निविदा सरस ठरली. या प्रकल्पासाठी २८ हजार ५०० कोटींची गुंतवणूक करण्यास संयुक्त अरब अमीरातीतील राजघराणे तयार असल्याचा दावाही कंपनीने केला आहे. मुख्य सचिवांच्या समितीनेही 'सेकलिंक'ची निविदा सरस ठरवत तसा प्रस्ताव राज्य शासनाला पाठविला. याबाबत अधिकृत घोषणा मुख्यमंत्र्यांकडून केली जाणार होती. मात्र १० मार्चपर्यंत घोषणा होऊ शकली नाही. त्यानंतर आचारसंहिता लागू झाल्याने ही घोषणा आचारसंहितेनंतर केली जाईल, असे स्पष्ट करण्यात आले. मात्र अलीकडेच मुख्यमंत्र्यांनी या निविदा प्रक्रियेचाच फेरविचार केला जाण्याची शक्यता बोलून दाखविली.



## यंदाच्या पावसाळ्यात २८ मोठ्या भरतीचे तर नीप टाईडचे १२ दिवस

**मुंबई-** मोठ्या भरतीच्या दिवशी मुसळधार पाऊस कोसळल्यास मुंबईची तुंबापुरी होते. हेच नव्हेतर, 'नीप टाईड'चे दिवसही मुंबईसाठी धोकादायक ठरू लागले आहेत. या वर्षी पावसाळ्यात २८ दिवस मोठ्या भरतीचे तर १२ दिवस नीप टाईडचे असणार आहेत, अशी माहिती मुंबई महापालिकेकडून देण्यात आली आहे.

मुंबईतील पर्जन्य जलवाहिन्या ताशी सुमारे ५० मीमी पावसाचे पाणी वाहून नेत आहेत. मात्र मोठ्या भरतीच्या दिवशी समुद्रात ४.५ मीटर उंचीच्या लाटा उसळतात. अशा वेळी मुसळधार पाऊस कोसळल्यास मुंबईतील सकल भागांमध्ये पाणी तुंबते. त्यामुळे दरवर्षी पावसाळ्यापूर्वी अशा मोठ्या भरतीच्या दिवसांची यादी तयार करून त्या दिवशी महापालिका किनारपट्टीवर विशेष काळजी घेते.

दोन वर्षांपूर्वी नीप टाईडच्या दिवशी मोठा पाऊस होऊन मुंबईची तुंबापुरी झाली होती. त्या अनुभवानंतर मोठ्या भरतीच्या दिवसांबरोबरच पालिकेने तयार करण्यास सुरुवात केली. या दोन्ही भरतीच्या याद्या वाहतूक पोलीस, अग्निशमन दल आणि अन्य प्राधिकरणांना महापालिकेच्या आपत्कालीन व्यवस्थापन विभागाने पाठविल्या आहेत.

जेणेकरून अशा भरतीच्या दिवशीही मुंबईकर आणि संबंधित यंत्रणा सतर्क राहतील, ज्यामुळे जीवित व वित्तहानी टाळणे शक्य होईल.

## आठ वर्षांनंतर मुंबईतील माता मृत्युदर १४४ वर

### धोकादायक मातांचे वेळेत निदान आणि उपचार; प्रसूतीमधील संभाव्य धोक्याबाबत जनजागृती

**मुंबई-** गंभीर प्रकृती असलेल्या मातांचे वेळेत निदान आणि उपचार, उपनगरीय रुग्णालयांमध्ये प्रसूतीसाठी अद्ययावत सुविधा, माता नोंदणीवरील भर आणि प्रसूतीमधील संभाव्य धोक्याबाबतची जनजागृती यामुळे गेल्या काही वर्षांत वाढलेला माता मृत्युदर आठ वर्षांनी पूर्ववत म्हणजेच १४४ वर आणण्यात मुंबई महापालिकेला यश आले आहे. पालिकेच्या आरोग्य विभागाच्या आकडेवारीनुसार, २०१७ मध्ये नोंदलेला १५३ माता मृत्युदर २०१८ मध्ये १४४ पर्यंत कमी झाला आहे. येत्या काळात हा दर आणखी कमी करण्याचे आव्हान पालिकेला पेलायचे आहे.



२०११ मध्ये मुंबईचा माता मृत्युदर १४३ होता. मात्र त्यानंतर वाढत्या लोकसंख्येच्या तुलनेत अपुरी सेवासुविधा आणि स्थलांतरण इत्यादी कारणांमुळे यात उत्तरोत्तर वाढ होऊन २०१६ मध्ये तो २०० वर पोहचला. या वाढलेल्या मृत्युदराचे विश्लेषण केईएम रुग्णालयाच्या कम्युनिटी मेडिसीन विभागाच्या डॉ. अनुराधा मोहपात्र आणि पालिकेच्या कुटुंब कल्याण विभागाच्या तत्कालीन प्रमुख डॉ. मंगला गोमारे यांनी शोधनिबंधामध्ये केले होते. त्यात पोषण पुनर्वसन केंद्रासह आरोग्य विभागातील अपुरे मनुष्यबळ, खासगी रुग्णालयांमध्ये प्रतिबंधात्मक काळजीचा अभाव, दुर्गम भागांतील मातांची नोंदणी इत्यादी आव्हानात्मक प्रश्न पालिकेसमोर असल्याचे यामध्ये मांडले होते. मात्र, २०१७ मध्ये पालिकेच्या माता मृत्युदराने सात वर्षांनी प्रथम घट झाली.

## यंदा महाविद्यालये उशिरा सुरू होणार?

**मुंबई-** उन्हाळी परीक्षांच्या पेपर तपाणीसाठी प्राध्यापकांनी वेळ द्यावा, असे आवाहन विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. सुहास पेडणेकर यांनी केले आहे. मात्र, प्राध्यापकांच्या बुक्टू संघटनेकडून याचा निषेध करत फोर्ट कँपस येथील मुख्य प्रशासकीय इमारतीच्या प्रवेशद्वारातच आंदोलन केले. दरम्यान, अकॅडमिक कौन्सिलची बैठक बोलावून जूनमध्ये महाविद्यालये उशिरा सुरू करण्याबाबतचा निर्णय घेण्याचे आश्वासन कुलगुरूंनी आंदोलनकर्त्या संघटनेला दिले आहे. त्यामुळे यंदा महाविद्यालये उशिरा सुरू होण्याची शक्यता आहे. निकाल वेळेत लागावा यासाठी प्राध्यापकांनी उन्हाळी सुट्टीवर न जाता उत्तरपत्रिका तपासण्याचे काम करावे, असे आवाहन विद्यापीठाने केले. यामुळे प्राध्यापकांची सुट्टी वाया जात असल्याने बुक्टूने निदर्शने केली. आंदोलनकर्त्यांवर दबाव आणण्यासाठी विद्यापीठाने पोलिसांना बोलावले. या कृतीचाही प्राध्यापकांनी निषेध केला.

पृष्ठ १ वरुन

## अखेर सुप्रीम कोर्टाचा बीएमसीला हिरवा कंदील

असे बजावूनही ते सुरूच ठेवल्याबाबत नाराजी व्यक्त करत प्रकल्पाकरिता समुद्रात टाकण्यात येणाऱ्या भरावाच्या कामासह सागरी किनारा मार्गाचे बांधकाम थांबवावे आणि परिस्थिती 'जैसे थे' ठेवण्याचे आदेश न्यायालयाने दिले होते. या प्रकल्पाच्या कामामुळे सागरी किनाऱ्यालगत झालेले पर्यावरणीय नुकसान झाले तेवढे पुरे झाले. यापुढे ते केले जाऊ नये, याचा पुनरुच्चारही न्यायालयाने स्थगितीचे आदेश देताना केला होता.

**पालिकेचे २०० कोटी वाचले?**

अमरसन्स गार्डन, वरळी आदी किनारपट्टी भागांत भराव टाकण्याचे काम पालिकेने हाती घेतले होते. उच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर हे काम बंद करण्यात आले होते. त्यामुळे टाकलेला भराव पावसाळ्यापूर्वी संरक्षित न केल्यास सुमारे २०० कोटी रुपये पाण्यात जाण्याची भीती पालिका अधिकाऱ्यांकडून व्यक्त केली जात होती. पहिल्या पट्ट्यातील प्रिन्सेस स्ट्रीट ते वरळी सागरी सेतूदरम्यानच्या किनारी मार्गाचे काम पालिकेवर सोपविण्यात आले असून पालिकेने वरळी, अमरसन्स गार्डन, हाजी अली येथे प्रकल्पाच्या कामाला सुरुवात केली होती. काही ठिकाणी भरावभूमी निर्माण करण्याचे काम युद्धपातळीवर हाती घेण्यात आले होते. आतापर्यंत काही ठिकाणी समुद्रात भराव टाकण्यात आला आहे. सर्वोच्च न्यालयाच्या या निर्णयामुळे महापालिकेला पुन्हा काम सुरु करता येणार असून टाकलेला भराव पावसाळ्यापूर्वी संरक्षित करता येणार आहे.

## बँकेत जायचा वेळ वाचवा, ATMमधून करू शकता ८ महत्त्वाची कामं

१०० आणि ५० रुपयांच्या नोटा जमा करता येतात.

**४. इन्शुरन्स पॉलिसीचे पैसे भरू शकता** : LIC, HDFC लाइफ आणि SBI लाइफसारख्या विमा कंपनींनी बँकांसोबत करार केलाय. त्यानुसार या कंपन्यांचे विमा ग्राहत एटीएममधून विमा भरू शकतात. यासाठी तुम्हाला पॉलिसी नंबर तयार ठेवावा लागेल. एटीएमच्या बिलावर सेक्शनमध्ये विमा कंपनीचं नाव सिलेक्ट करावं लागेल. यानंतर पॉलिसी नंबर एंटर करावा लागेल. त्यानंतर जन्मतारीख आणि मोबाइल नंबर. मग प्रीमियमची रक्कम अॅड करा आणि कन्फर्म करा.

**५. कर्जासाठी अर्ज करू शकता** : कमी रकमेच्या पर्सनल लोनसाठी तुम्ही ATMमधून अप्लाय करू शकता. त्यासाठी तुम्हाला फोन बँकिंग किंवा बँक ब्रँचपर्यंत जायची गरज नाही. अनेक खासगी बँका ATM मधून आपल्या ग्राहकांना प्री अॅप्रुव्हड पर्सनल लोन देतात.

हे कर्ज तुम्ही ATMमधून काढू शकता. कर्जाची रक्कम अॅडव्हान्स अॅनालिटिक्स पडताळून पाहतो. त्यासाठी ग्राहकांचे ट्रॅन्झॅक्शन डिटेल्स, अकाउंट बॅलन्स, पगाराची रक्कम, क्रेडिट,डेबिट कार्डाच्या रिपेमेंटचे डिटेल्स हे सगळ तपासलं जातं.

**६. पैसे ट्रान्सफर** : तुम्ही नेटबँकिंग करत नसाल तर ATMच्या मदतीनं तुमच्या खात्यातून दुसऱ्या खात्यात रक्कम ट्रान्सफर करू शकता. त्यासाठी तुम्हाला ऑनलाइन किंवा ब्रँचमध्ये जाऊन त्या खात्यात रजिस्टर करावं लागेलं, ज्या खात्यात रक्कम ट्रान्सफर करायची आहे. एका वेळी ATMमधून तुम्ही ४० हजार रुपयापर्यंत ट्रान्सफर करू शकता. एका दिवसात तुम्ही अनेक वेळा रक्कम ट्रान्सफर करू शकता.

**७. ही बिलं भरू शकता** : टेलिफोन, वीज, गॅस किंवा दुसरी अनेक बिलं एटीएमद्वारे भरू शकता. याआधी तुम्हाला बँकेच्या वेबसाइटवर स्वत: रजिस्टर करावं लागेल.

**८. ट्रेनचं तिकीट बुक करा** : देशाची सर्वात मोठी बँक SBI एटीएमद्वारा तिकीट बुक करायची सेवा देते. यात तुम्ही लांब पल्ल्याच्या ट्रेन्सची तिकिटं बुक करू शकता.

## शंभर टक्के अनुदान मिळणाऱ्या शाळा व महाविद्यालयेच 'अनुदानित' - उच्च न्यायालय

नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर सेवेत रुजू झालेल्यांना डीसीपीनुसार सेवानिवृत्ती योजनेचा लाभ देण्याचा निर्णय सरकारने घेतला.

सरकारने २०१० मध्ये आणखी एक शासन निर्णय काढत ३१ ऑक्टोबर २००५ रोजीच्या शासन निर्णयाबाबत अधिक स्पष्टीकरण दिले. त्यानुसार, १ नोव्हेंबर २००५ पूर्वी खासगी टप्पा अनुदानित शाळा व महाविद्यालयात शिक्षक किंवा शिक्षकेतर कर्मचारी म्हणून सेवेत रुजू झालेल्यांनाही डीसीपी योजनेचाच लाभ मिळेल. सरकारच्या ३० ऑक्टोबर २००५ व २०१० च्या धोरणात्मक निर्णयाला राज्यातील अनेक शिक्षकांनी व शिक्षक संघटनांनी उच्च न्यायालयात आव्हान दिले. नागपूर खंडपीठापुढे अनेक याचिका दाखल करण्यात आल्या. त्यावेळी नागपूर खंडपीठाने राज्य सरकारचा निर्णय योग्य ठरविला. मात्र, नागपूर खंडपीठापुढे दाखल करण्यात आलेल्या याचिकांमध्ये अनेक महत्त्वाचे मुद्दे उपस्थित करण्यात न आल्याने काही शिक्षकांनी व शिक्षकांच्या संघटनांनी पुन्हा एकदा मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली.

## संपादकीय... साठा आणि वाटा


संपादक:-
दिपक मोरेश्वर नाईक

उत्तरेकडे डोंगराळ हिमाचल प्रदेश, तर दक्षिणेकडे सागरी किनारपट्टी लाभलेले केरळ. अखंड भारताचा वरून खाली सांधा जुळविणारी ही देशाची दोन टोकेच. हे दोन्ही प्रदेश निसर्गाच्या संपन्नतेशी आणि विपुलतेशी आपली भेट घालून देतात. या दोन प्रदेशांमध्ये मानव विकास मूल्यांचीही संपन्नता आहे. असमानता आणि गरिबी निर्मूलनात ते अग्रेसर आहेत. शून्य भूकबळी, चांगले आरोग्यमान, दर्जेदार शिक्षण, स्वच्छ पेयजल आणि स्वच्छता, किफायती ऊर्जेची उपलब्धता, अल्पतम महिला अत्याचार व हिंसा आणि तेथे तुलनेने चांगल्या पायाभूत सोयीसुविधाही आहेत. आपल्या निती आयोगाने तयार केलेल्या अहवालानेच याची पुष्टी केली आहे. संयुक्त राष्ट्रांकडून निर्धारित 'शाश्वत विकास ध्येयां'च्या आधारे राज्यवार कामगिरीचे मापन करणाऱ्या निर्देशांकात केरळ, हिमाचल, तमिळनाडू ही राज्ये आघाडीवर आहेत.

उद्याची जागतिक महासत्ता आणि सध्याची जगातील सर्वात वेगवान अर्थव्यवस्था असलेल्या भारताने संयुक्त राष्ट्रांकडून निर्धारित शाश्वत विकास ध्येयांशी (एसडीजी) बांधिलकी सांगणे केवळ अपरिहार्य नव्हे तर भागच होते. त्याप्रमाणे या ध्येयांचा अवलंब २०१५ सालात भारताने जगातील अन्य १९२ देशांसह केला. इतकेच काय निर्धारित १७ पैकी १३ ध्येयांनुसार 'एसडीजी इंडिया इंडेक्स' तयार करून कामगिरीच्या मापनाला सुरुवात करणाऱ्या पहिल्या काही राष्ट्रांमध्ये भारत आहे. समन्यायी व सार्वत्रिक मानव विकास अशी व्यापक दृष्टी असणारी ही उद्दिष्टे २०३० पर्यंत गाठून, त्या संबंधाने सर्व समस्यांना पूर्णविराम दिला जावा असा यामागे ध्यास आहे. या ध्यासपूर्ततेसाठी केंद्र व राज्य सरकारचे वेगवेगळे विभाग, उद्योग घराणी, स्वयंसेवी संस्था, जनप्रतिनिधी आणि व्यापक लोकसहभाग संघटित करणे अपेक्षित आहे. सरलेल्या डिसेंबरमध्ये याचा प्रारंभिक आधारभूत अहवाल आला आणि ताज्या बठकीत निती आयोगाने त्याचे पुनरावलोकनही प्रस्तुत केले आहे.




पारदर्शकता आणि सामान्य माणसालाही समजून घेता येईल असा सोपेपणा हे या अहवालाचे महत्त्वाचे वैशिष्टय़ ठरावे. सुस्पष्टतेसाठी तक्ते, चित्रे आणि नकाशांचा सुबक वापर खासच. आर्थिक संपन्नतेपुरताच नव्हे, तर लिंग, वय, वर्ण, धर्म, जात आणि भौगोलिक दुर्गमता-सुगमता असे नाना भेद असलेल्या भारताला समान सूत्रात गुंफणारे प्रतिबिंब मिळविण्याचे खूप अवघड काम यातून घडू पाहत आहे. ही या अहवालाची जमेची बाजूही आहे. परंपरेने जपत आलेल्या अनेक धारणा आणि समजुती गळून पडाव्यात असा भरपूर ऐवज या अहवालाने पुढे आणला आहे. काही नमुनेच पाहा ना. मिझोराम, त्रिपुरा, मेघालय ही सर्वालेखी दुर्लक्षित अशी ईशान्येकडील राज्ये. ती आणि उत्तराखंड ही आजघडीला वेगाने गरिबीनिर्मूलन करीत असलेली राज्ये असल्याचे अहवाल सांगतो! त्याचप्रमाणे आर्थिक प्रगतीचे द्योतक ठरलेल्या प्रदेशांचे मानव विकास मूल्यांकनही सर्वोत्तमच असेल हा समजही अहवाल खोडून काढतो. प्रमाण म्हणून सकल राज्य उत्पादितात अग्रेसर आणि औद्योगिकदृष्टय़ा प्रगत महाराष्ट्र, गुजरात राज्याची एसडीजी निर्देशांकावरील कामगिरी पाहावी. अहवालाने राज्यांना कामगिरीनुसार गुणानुक्रम दिला आहे आणि अग्रणी, कामगिरीवान, आकांक्षावान अशी त्यांची वर्गवारी केली आहे. यापैकी तिसऱ्या श्रेणीत ही प्रगत म्हणवली जाणारी राज्ये आहेत तीही अगदी बिहार, झारखंड, उत्तर प्रदेश आणि लक्षद्वीपच्या पंक्तीत. एकुणात देश म्हणून भारताला अपेक्षित मानव विकासाच्या आघाडीवर अद्याप खूप पल्ला गाठावयाचा आहे. मात्र ज्यांच्याकडून सर्वाधिक अपेक्षा करावी त्या महाराष्ट्र, गुजरात, दिल्लीची कामगिरी मात्र उत्साहवर्धक नाही. हे असे राज्यांचे मागे पडणे कशाचे द्योतक आहे?

या प्रश्नाचा वेध घेताना गेल्या तीन दशकांतील अर्थव्यवस्थेतील धोरणात्मक स्थित्यंतर आणि त्यातून घडून आलेले आर्थिक-सामाजिक बदल यांचा पुनर्वेध महत्त्वाचा ठरेल. अर्थव्यवस्थेची कार्यक्षमता वाढविण्यासाठी बाजारपेठेचा विस्तार व व्याप वाढविण्याचे प्रयत्न याच दरम्यानचे आहेत. आर्थिक सुधारणांचे पहिले चरण हे बाजारपेठेला बळ देण्यातूनच सुरू झाले. मात्र हे होत असताना ग्रामीण भागातील सेवा-सुविधांचा विस्तार आणि दर्जा सुधार, शिक्षण-आरोग्य यांसारख्या सामाजिक सेवांमधील गुंतवणूक वाढू शकली नाही. मनरेगा, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान, ग्रामीण उपजीविका अभियान, पंतप्रधान ग्रामीण सडक योजना, आवास योजना अशा कल्याणकारी योजना जरूर आल्या. परंतु या योजना रोजगारनिर्मितीला चालना आणि उपजीविकेला शाश्वत आधार काही केल्या देऊ शकल्या नाहीत. ग्रामीण भागातील उपजीविकेचे पारंपरिक ज्ञान, कसब आणि साधने यांना बळ देण्याकडे अक्षम्य दुर्लक्ष झाले. किंबहुना, नव-बाजारवादी आक्रमणाने त्यांची गळचेपी केली.

# आज शंभर वर्षांनी भारत असाच...

**भारताच्या राजकीय इतिहासाला वळण लावणारे वर्ष म्हणून १९१९ ओळखले जाते. काय काय नाही पाहिले भारताने या वर्षी? त्यातील सर्वात भयंकर गोष्ट जालियनवाला बागेची. जनरल डायर याने रॉलेट ॲक्टचा धिक्कार करण्यासाठी जमलेल्या हजारो भारतीय आंदोलकांवर गोळ्या झाडल्या. इंग्रजी सत्ता सभ्य, सुसंस्कृत आणि सहिष्णू असल्याचा समज याच गोळीबारात नष्ट झाला. गांधीजींचे नेतृत्व याच वर्षी भारताने मानले. काँग्रेसचे सदस्य म्हणून गांधीजी अमृतसरच्या अधिवेशनात १९१९ लाच कार्यरत झाले. गांधींबरोबर काँग्रेसची सूत्रे नेमस्त सत्याग्रहींच्या हातात गेली.**

या हत्याकांडाच्या निषेधार्थ गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांनी त्यांचे 'नाइटहूड' इंग्रज सरकारला परत केले. ते वर्षही १९१९. गांधींनी त्यांचे 'नवजीवन' हे गुजराती पत्र सुरू करायला वर्ष निवडले तेही १९१९च. 'नवजीवन'च्या जन्माच्या दुसऱ्या दिवशी 'यंग इंडिया'ने जन्म घेतला. महागाईने अवघा शेतकरी होरपळत होता. औद्योगिक कामगार कामाच्या ठिकाणच्या परिस्थितीने इतका गांजला की १९१९ उजाडताच त्याने ठिकठिकाणी संप सुरू केले. पराभूत खलिफाशी साम्राज्यवादी इंग्रज वाईट वागल्याने मुसलमान रागावले होते. रॉलेट ॲक्टने सरकारवरील टीकेस देशद्रोह ठरवण्यासाठी वर्ष निवडले ते १९१९. हा कायदा मागे घ्यायला लावावा यासाठी गांधींची 'सत्याग्रह सभा' मुंबईत भरली ते हेच वर्ष. 'मुंबईत प्रथमच हरताळ यशस्वी झाला. पहिले महायुद्ध १९१८ ला संपले, पण १९१९ पासून साम्राज्यातील आयर्लंड या देशात शिनफिनने बंड सुरू केले. इजिप्तनेही बंडखोरी अनुभवली. सोव्हिएत क्रांती झालेल्या समाजवादी रशियावर ब्रिटन, अमेरिका, फ्रान्स व जपान यांनी चाल केली. शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भेट १९१९ मध्येच झाली आणि महाराजांच्या आर्थिक मदतीच्या बळावर आंबेडकरांनी १ जानेवारी १९२० ला 'मूकनायक' सुरू करून विद्रोही पत्रकारितेचा पाया रचला. १९१९ मध्येच आंबेडकरांनी साऊथबरो समितीला अस्पृश्यांच्या परिस्थितीवर जे निवेदन दिले तेच त्यांच्या राजकारणाचे आजन्म आधार बनले आणि देशाचे लक्ष एका महत्त्वाच्या प्रश्नाकडे वेधले गेले. महान क्रांतिकारक कॉ. मानवेंद्रनाथ रॉय १९१९ मध्येच सोव्हिएत रशियात पोहोचून कॉ. लेनिन यांना सामील झाले आणि भारतात साम्यवाद कसा स्थापन करायचा याचे डावपेच आखू लागले. गदर पार्टीचे एक संस्थापक क्रांतिकारक पांडुरंग खानखोजे आपल्या राजकीय गुरूला म्हणजे टिळकांना भेटायला मुंबईत लपतछपत आले आणि जर्मनीत ते साम्राज्यवाद्यांच्या विरोधात काय कारवाया करीत आहेत ते त्यांच्या कानावर टाकून पुन्हा पळून गेले. वर्ष १९१९.




एका संपादकाची कर्तबगारी तर फार धाडसाची. जालियनवाला बागेत एवढे प्रचंड हत्याकांड घडल्यावरही ते भारताला कळले नव्हते. महिनाभर कोणाला पत्ताच नव्हता. ब्रिटिशांनी सारी माहिती दडपून टाकली होती. 'बॉम्बे क्रॉनिकल' नामक वृत्तपत्राचा ब्रिटिश संपादक बी. जी. हॉर्निमन याने मात्र या घटनेचे वृत्त तर मिळवलेच, शिवाय काही छायाचित्रेही मिळवली आणि इंग्लंडच्या लेबर पार्टीच्या दैनिकात छापून आणली. स्वतःच्या अंकातही बातमी छापली. झाले ! हॉर्निमन याचे दैनिक बंद करून ब्रिटिशांनी त्याची रवानगी मायदेशी करून टाकली. वर्ष अर्थातच १९१९.

आज २०१९ व्या वर्षी शंभर वर्षांनी भारत असाच अस्वस्थ, अशांत, सत्ताधाऱ्यांविरुद्ध रागावलेला दिसतो आहे. शेतकरी संतप्त आहे. कामगार चिडलेला आहे. सरकारी उपक्रमांतील कर्मचारी नोकरी जाण्याच्या भीतीने ग्रस्त आहेत. तरुण बेरोजगार आहे. दलित अन्याय – अत्याचार सोसतो आहे. महिलांना महागाईने जेरीस आणले आहे. मरगळलेल्या काँग्रेस पक्षात जान आल्यासारखे जाणवत आहे. वेगवेगळ्या राजकीय भूमिकांचे पक्ष व नेते एकत्र येत आहेत. गांधींचा जसा अचानक उदय झाला तसा राज ठाकरे यांचा पुनर्उदय झाला आहे. देशद्रोह अन् राजद्रोहाच्या धमक्यांनी अभिव्यक्तीवर संकट आणले आहे. हॉर्निमन यांच्यासारखी उचलबांगडी अनेक पत्रकारांची झाली आहे. कित्येक वार्ता दडपल्या जात आहेत. सत्याची हत्या केली जात आहे. १९१९ मध्ये मोहनदास गांधी ५० वर्षांचे होते. राहुल गांधींचे आज ४८ वय आहे. टिळक जसे गांधीजींच्या कल्पक नेतृत्वाचे कौतुक करू लागले होते तसे बुजुर्ग नेते शरद पवार राहुल यांच्या नेतृत्वाचे करू लागले आहेत.

गंमत म्हणजे एक घटना थेट शंभर वर्षांपूर्वीसारखीच घडते आहे. गांधींनी 'सत्याग्रह' नावाचे एक साप्ताहिक १९१९ मध्ये सरकारी नोंदणी न करताच सुरू केले. जिथे जिथे इंग्रजांच्या सत्तेच्या विरोधात सत्याग्रह होतील तिथे नोंदणी न करता 'सत्याग्रह' नावाचे एक पत्र सुरू करावे, असे त्यांनी म्हटले होते. बहुतेक वृत्तपत्रे फालतू मजकुराने भरलेली असतात असे सांगून गांधीजी सुचवतात, 'जे लिखाण प्रसिद्ध होते ते सरकारी दहशतीमुळे दुहेरी अर्थाचेही असू शकते. ज्याला सरकारी शिक्षेची दहशत वाटत नाही त्याने निभऱ्य मनाने आपले विचार व मते या साप्ताहिकात लिहावीत. त्याचे हे पत्र त्याने न घाबरता जनतेत वाटून टाकावे. ज्याला हे हस्तलिखित मिळेल त्याने ते स्वहस्ते लिहून पुन्हा पसरवावे. शिवाय प्रत्येकाने या पत्रावर आपले नाव, पत्ता दिला पाहिजे.

म्हणजे सरकारला कारवाई करावीशी वाटली तर ती करणे सोपे जाईल. सर्व सत्याग्रहींनी छोटे छोटे गट स्थापून उघडपणे या पत्राचे वितरण करीत जावे. मात्र सारे लेखन उच्च नैतिक मूल्याचे व शुद्ध स्वरूपाचे असावे. सत्याग्रहींनी आर्थिक भार आपला आपण उचलावा.' म्हणजे सोशल मीडियाचा जन्मही १९१९ चा आणि त्याचे जनक गांधीजी!

## वादळाचा प्रताप, अडकलेली मच्छीमार बोट सुखरूप आणली

**पालघर-** समुद्रात अचानक निर्माण झालेल्या वादळी वाऱ्याच्या फटकाऱ्याने सातपाटी येथील रवींद्र दवणे ह्यांची 'पंचाली' ही बोट भरकटुन बंधाऱ्याच्या दगडात अडकली. स्थानिक मच्छीमारांनी एकत्र येऊन ती सुखरूप बाहेर काढण्यात यश मिळविले. परंतु बोटीचे हजारो रुपयाचे नुकसान झाले आहे.



दक्षिण पूर्व बंगालच्या खाडी लगत ३० एप्रिल पासून निर्माण झालेल्या जास्त दाबाच्या पट्ट्यामुळे फनी हे निर्माण झालेले वादळ पुढील काही काळात तामिळनाडूच्या उत्तरे कडील किनाऱ्यावर तसेच आंध्रप्रदेशच्या दक्षिण किनाऱ्यावर धडकू शकते असा कयास हवामान खात्याकडून वर्तविण्यात आला होता.तसेच हे वादळ किनाऱ्यावर धडकण्यापूर्वी हे चक्रीवादळ परत फिरण्याची शक्यताही वर्तविण्यात आली आहे. सोमवार पासून दमण आणि गुजरात च्या समुद्रात मासेमारीसाठी गेलेल्या काही बोटींना खवळलेल्या समुद्राचा आणि जोरदार वाऱ्याचा सामना करावा लागला होता. ह्याचा फनी वादळाचा काहीही संबंध नसल्याचे हवामान खात्याकडून सांगण्यात आले आहे. तर मग सोमवार पासून समुद्रात गुजरात राज्याच्या काही भागात जोरदार वाऱ्याचे उमटत असलेले पडसाद कसले? असा प्रश्न सातपाटी मधील मच्छीमार महेश भोईर ह्यानी उपस्थित केला. ह्या संदर्भात हवामान विभागाशी संपर्क साधला असता फनी वादळशी ह्याचा कुठलाही संबंध नसून उष्णतेमुळे समुद्र खवळलेला राहत असावा असा तर्क त्यांनी व्यक्त केला.

जिल्ह्यातील पालघर,डहाणू व वसई भागातील हजारो बोटी ह्या मासेमारी साठी दिव-दमण किंवा गुजरातच्या जाफराबाद भागात जाऊन मंगळवारी आपल्या बंदरात परत येत असताना अनेक बोटींना जोरदार वारा आणि खवळलेल्या समुद्राचा सामना करीत सुखरूपपणे आपला किनारा गाठावा लागला होता.

# मोखाड्यातील ८६ गावे तहानली, टँकर लॉबी झाली गब्बर

**मोखाडा-** तालुक्यातील आदिवासी गाव पाड्यांना टँकर मुक्त पाणी पुरवठा व्हावा यासाठी गेल्या अनेक वर्षापासुन स्थानिक प्रशासन व लोकप्रतिनीधी कडून होणाऱ्या तोकड्या प्रयत्नांमुळे येते पाणीबाणीची परिस्थिती निर्माण झाली आहे. टंचाईकाळात येथील टँकर लॉबी पोशित होत असून तालुक्यातील ८६ गावपाड्यांना टंचाईचे चटके बसत आहेत.



नियोजनाचा अभाव, अपयशी ठरलेल्या नळ पाणी पुरवठा योजना, जलयुक्त शिवार योजना आदी मुळे टँकर मुक्त गावाची संख्या वर्ष निहाय कमी होण्या ऐवजी दरवर्षी वाढत चालली असुन महिलांना मैलोंमैल पायपीट करावी लागत आहे. तालुक्यात जवळपास पाच धरणे असुन त्याद्वारे १२० किलो मीटर अंतरावरील मुंबई शहराला त्याद्वारे पाणी पुरवठा होत असताना येथील गाव-पाड्यांना पाण्यासाठी दाहीदिशा फिराव्या लागत आहे.

तालुक्यातील धामणी, दापटी, गोळीचापाडा, स्वामीनगर, शास्त्रीनगर, भोवाडी, बिवलपाडा, कुडवा, आसे, वारघरपाडा, पेडक्याचीवाडी केवणाळा गोमघर, डोल्हारा, मोरहंडा, साखरवाडी, वाशिंद, शेलमपाडा, बनाचीवाडी सप्रेवाडी जांभूळवाडी चिकन पाडा बेरीस्ते, शेंड्याचीमेट अशा ८६ गाव पाड्यात पाणी बाणीचे संकट निर्माण झाले आहे. दिवसाआड पाणी टंचाई ग्रस्त गाव पाड्यांना २४ टँकर ने पाणी पुरवठा सुरू असून हिरवे पिंपळपाडा, पाटीलपाडा, कोडेसागवाडी, पारध्याचीमेट, कातकरीवाडी, उंबरवाडी, तेली उंबरपाडा, रामडोह अशा ११ गाव पाड्याची टँकरने पाणी पुरवठा मागणी प्रस्ताव पडून आहे. दिवसा गणिक टँकरद्वारे पाणी पुरवठ्याचे मागणी प्रस्ताव पाणी पुरवठा विभागाकडे येऊन धडकत असल्याने प्रशासनाची देखील धावपळ उडत आहे. यामुळे उन्हाळाच्या सुरवातीला दरवर्षी उद्भवणाऱ्या परिस्थितीवर कायम स्वरुपी तोडगा काढण्याचे शहाणपण मात्र कोणालाच सुचत नसल्याने गाव पाडावासीयांकडून रोष व्यक्त केला जात आहे. गाव पाड्यांना पाणी पुरवठा करणाऱ्या विहिरी पासुन टंचाई ग्रस्त गाव पाडे २० - २५ किलो मीटर अंतरावर विखुरलेले असल्याने टँकर चालकांनाही चांगलीच कसरत करावी लागत आहे.

तालुक्यात उष्णतेमुळे पाण्याची पातळी कमी झाली असून तालुक्यातील नदी, नाले, ओहळ, आटून गेले आहे त्यांमुळे लोकाना पिण्यासाठी वणवण फिरावे लागत आहे. ही दाहकता अशीच राहली तर तालुक्यात भिषण टंचाईला सामोरे जावे लागणार आहे. संभाव्य आराखडा हा ८४ गावाचा बनविण्यात आला असून आता पर्यत तालुक्यातील खुडेद पैकी धोडीपाडा, कुडाचापाडा झापपाडा या तीन ठिकाणी टँकर ने पाणी पुरवठा सुरू आहे.


## एका पोलिसाच्या खांद्यावर २६४२ नागरिकांची सुरक्षा, कायदा, सुव्यवस्था रामभरोसे



**नालासोपारा -** नालासोपाऱ्यात गुन्हेगारी स्वरुपांच्या घटनांचा वाढता आलेख व त्यामुळे बळावलेला कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न या पार्श्वभूमीवर पाच वर्षापूर्वी तुळींज पोलीस ठाण्याची निर्मिती केली. मात्र, नालासोपाऱ्याच्या तुळींज पोलीस ठाण्यात ४ महिन्यात तब्बल ५८० दखलपात्र गुन्हे नोंदविले गेले असून अदखलपात्र स्वरुपाच्या गुन्ह्यांच्या संख्येने ३४२२ चा आकडा गाठला आहे. या ठाण्यात २ पोलीस निरीक्षक, ५ सहायक पोलिस निरीक्षक, ११ पोलीस उपनिरीक्षक, १४ सहायक उपनिरीक्षक, १२१ पोलीस कर्मचारी असा एकूण १५३ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा तुटपुंजा समावेश आहे. तर ३ बिट मार्शल पोलीसांच्या ताफ्यात आहेत. अधिकृत ३ लाख ५६ हजार ७०५ असून प्रत्यक्षात ७ ते ८ लाख लोकसंख्या तुळींज पोलीस ठाण्याच्या हद्दीत आहे. किमान २०० ते २५० पोलीस कर्मचारी आणि ३० ते ३५ अधिकारी येवढे मनुष्यबळ तुळींज पोलीस ठाण्यात आवश्यक आहे.

मुंबईमध्ये एक हजार लोकसंख्येसाठी एक पोलीस कर्मचारी अशी रचना आहे. त्यामुळे मुंबई पोलिसांच्या तुलनेत तुळींज पोलिस ठाण्याच्या हद्दीमधील ३ लाख ५६ हजार ७०५ लोकसंख्येला (२०११ च्या जनगणनेनुसार) एका पोलिसांवर २६४२ लोकांच्या सुरक्षेचा भार असल्याचे दिसून येत आहे.

## कचरा रोखण्यासाठी भिंत!



**नायगांव- मध्य रेल्वे मार्गावरील पारसिक बोगद्याच्या कळव्याच्या दिशेने डाव्या बाजूला रेल्वे प्रशासनाने आणखी एक भिंत बांधण्यास सुरुवात केली आहे. ही भिंत रेल्वे रुळापासून काही मीटर अंतरावर असल्याने रेल्वे रुळांवर पडणारा कचरा यामुळे सहज रोखला जाईल, असा रेल्वे प्रशासनाचा दावा आहे. तसेच या भागातून रेल्वे मार्गाला असलेला धोकाही यामुळे टळू शकणार आहे.**

ही भिंत बांधली जावी यासाठी रेल्वे प्रवासी संघटनांकडून गेल्या काही वर्षांपासून सतत पाठपुरावा सुरू होता.

मध्य रेल्वेच्या जलद मार्गावरील प्रवासासाठी पारसिक बोगदा अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. गेल्या काही वर्षांपासून बोगद्याच्या कळव्या दिशेकडे मोठठ्या प्रमाणात बेकायदा वसाहती उभ्या राहिल्या आहेत. ठाणे महापालिकेचे या बेकायदा वस्त्यांकडे दुर्लक्ष होत असल्याने दिवसागणिक त्यामध्ये भर पडू लागली आहे. या वस्त्यांमधून राहणाऱ्या नागरिकांकडून रेल्वे रुळांवर मोठठ्या प्रमाणात कचरा फेकण्यात येतो. हा कचरा वेचण्यासाठी मध्यंतरी महापालिका प्रशासनाने मोठी यंत्रणा राबवली. त्यानंतर रेल्वे प्रवास धोकादायक ठरू नये म्हणून पाच वर्षांपूर्वी रेल्वेने बोगद्याच्या कळव्याच्या दिशेने डावी आणि उजवीकडे उंच भिंती बांधल्या. मात्र, तरीही नागरिकांकडून कचरा रेल्वे रुळांच्या दिशेने भिरकावला जात होता. त्यानंतर रेल्वे प्रशासनाने पुन्हा रेल्वे रुळाच्या उजवीकडे एक आणखी लहान भिंत बांधली होती. या भिंतीमुळे उजवीकडून फेकण्यात येणारा कचरा काही प्रमाणात रोखला जात होता. मात्र, रेल्वे रुळाच्या डावीकडे मोठी नागरी वस्ती आहे. त्या ठिकाणी रेल्वे प्रशासनाने रेल्वे रूळाच्या बाजूला भिंत बांधली नव्हती. त्यामुळे कचरा थेट रेल्वे रुळांवर पडण्याची भीती निर्माण झाली होती.

## धोकादायक इमारत दुरुस्ती संथगतीने


**ठाणे-** अत्यंत धोकादायक बनलेल्या वाडा पंचायत समितीच्या कार्यालयाची इमारतीचे दुरुस्तीचे काम गेल्या चार महिन्यांपासून संथगतीने सुरू आहे. अशा स्थितीतही कर्मचारी जीव मुठीत घेऊन कामकाज करीत आहे. याच गतीने दुरुस्तीचे काम सुरू राहिले तर पावसाळ्यात मोठा धोका निर्माण होऊ शकतो अशी भीती व्यक्त करण्यात येत आहे. वाडा पंचायत समितीच्या कार्यालयाची संपूर्ण इमारत धोकादायक झालेली आहे. असे असतानाही तिच्यावर दुरुस्तीपोटी दर वर्षी लाखो रुपये खर्च केले जात आहेत. या वर्षी दुरुस्तीवर तब्बल २२ लाख रुपये खर्च करण्यात येणार आहे. दुरुस्तीचे काम गेल्या चार महिन्यांपासून सुरू आहे. चार महिन्यांत दुरुस्तीचे काम २५ टक्केही झालेले नाही. उर्वरित काम महिनाभरात कसे होणार ही भीती या इमारतीच्या तळमजल्यावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे. इमारतीच्या पहिल्या मजल्याचे व छताचे दुरुस्तीचे काम सुरू आहे. पहिल्या मजल्यावर बांधकाम, पाणीपुरवठा, कृषी तसेच पाटबंधारे विभाग यांची कार्यालये आहेत. कर्मचारी निवासस्थानी हलविण्यात आली आहेत. तळमजल्यावर सभापती, उपसभापती, गटविकास अधिकारी, ग्रामपंचायत प्रशासन, शिक्षण विभाग व महिला बाल कल्याण विभाग यांची कार्यालये आहेत.



## थोडक्यात महत्वाचे

### भाजपा नगरसेवकाला बलात्काराच्या गुन्ह्यात अडकवण्याची धमकी, तरुणीला अटक

**मुंबई-** कल्याणमधील भाजपा नगरसेवक दया गायकवाड यांच्याकडून खंडणी उकळणाऱ्या तरुणीला खडकपाडा पोलिसांनी अटक केली आहे. बलात्काराचा गुन्हा दाखल करण्याची धमकी देत संबंधित



तरुणीने दया गायकवाड यांच्याकडून तीन लाख रुपये उकळले होते. सप्टेंबर २०१७ मध्ये भाजपा नगरसेवक दया गायकवाड यांच्यावर २७ वर्षांच्या तरुणीने बलात्काराचा आरोप केला होता. लग्नाचे आमीष दाखवून तिच्यावर बलात्कार केल्याचा आरोप तरुणीने केला होता. काही महिन्यांनी तरुणीने तक्रार मागे घेतली होती. गेल्या काही महिन्यांपासून संबंधित तरुणीने दया गायकवाड यांना ब्लॅकमेल करायला सुरुवात केली. बलात्काराच्या गुन्ह्यात अडकवण्याची धमकी देत तरुणीने दया गायकवाड यांच्याकडे पैशांची मागणी केली. गायकवाड यांनी तरुणीला कार्यालयात बोलावून तीन लाख रुपये दिले. हा सर्व प्रकार सीसीटीव्ही कॅमेऱ्यातही कैद झाला होता. पैसे घेऊन निघण्याच्या तयारीत असतानाच खडकपाडा पोलिसांनी तिला रंगेहाथ पकडले.

### पोलिसांना महिनाभर पोट कमी करण्याची ड्यूटी, तंदुरुस्त ठेवण्यासाठी उपक्रम

**औरंगाबाद -** कामाचा अति ताण, अवेळी जेवण आणि आरोग्याकडे दुर्लक्ष होत असल्याने पोलिस विभागातील कर्मचाऱ्यांमध्ये स्थूलत्वाचे प्रमाण वाढत चालले आहे. औरंगाबाद पोलिस दलातील अशाच पोट सुटलेल्या कर्मचाऱ्यांचे वजन कमी करण्यासाठी तसेच त्यांना निरोगी



ठेवण्यासाठी विभागाकडून प्रयत्न केले जाणार आहेत. विविध पोलिस ठाण्यांतील २९ जणांची आता ३० दिवस फक्त वजन कमी करण्याची ड्यूटी लागणार आहे. ६ मे पासून २९ कर्मचाऱ्यांची पहिली बॅच सुरू होत आहे. कर्मचारी-अधिकाऱ्यांना निरोगी ठेवण्यासाठी पोलिस महासंचालकाकडून विशेष उपक्रम सुरू करण्यात येत आहे. त्याच धर्तीवर शहर पोलिस दलातील स्थूल कर्मचाऱ्यांसाठी विशेष उजळणी कोर्स आयोजित करण्यात आला आहे. याअंतर्गत त्यांचे वजन कमी करून त्यांच्या सर्व आरोग्य तपासणी करण्यात येणार आहे. विशेष म्हणजे औरंगाबाद पोलिस दलात पहिल्यांदाच हा उपक्रम राबवण्यात येणार आहे. सहा दिवसांपूर्वी सर्व शाखा व पोलिस ठाण्यांना स्थूल कर्मचाऱ्यांची यादी पाठवण्याचे आदेश देण्यात आले होते. त्याप्रमाणे २९ कर्मचाऱ्यांची यादी प्रशासन विभागाला मिळाली. शुक्रवारी २९ कर्मचाऱ्यांना पोलिस आयुक्तालयात बोलावण्यात आले होते. त्यांना उजळणी कोर्सला उपस्थित राहण्याचे आदेश देण्यात आले. त्यांना दैनंदिन कामातून सूट असेल. २९ जणांच्या बॅचमध्ये ६ महिला, तर २३ पुरुष कर्मचारी आहेत.

### मोलकरणीवर बलात्कार केल्याप्रकरणी बँक मॅनेजरला सात वर्षांची शिक्षा

**मुंबई-** मोलकरणीवर बलात्कार केल्याप्रकरणी एका राष्ट्रीयकृत बँकेतील मॅनेजरला (५२) न्यायालयाने सात वर्षांच्या तुरुंगवासाबरोबर एक लाख रुपयांचा दंड भरण्याची शिक्षा सुनावली आहे. ही घटना पश्चिम उपनगरात २०१३ साली घडली असून आरोपी जामीनावर



होता. पण न्यायालयीन सुनावणीनंतर त्याला आता अटक करण्यात आली आहे. पीडित महिला (४२) संबंधित व्यक्तीकडे दोन वर्षांपासून काम करत होती. पण नंतर त्याची बदली दुसऱ्या शहरात झाल्याने त्याने तिला काम मिळवून देण्याचे आश्वासन देत तिथे बोलावले. पण तिथे गेल्यावर त्याने तिच्यावर बलात्कार केला व तिला पैसे देत परत मुंबईला जाण्यास सांगितले. या घटनेनंतर मुंबईत परतलेल्या पीडीतेने मॅनेजर विरोधात तक्रार दाखल केली होती. दरम्यान, याप्रकरणी बिल्डींगच्या वॉचमनची साक्ष, वैद्यकिय अहवाल आणि उपलब्ध पुराव्यांच्या आधारावर मॅनेजरला दोषी ठरवत न्यायालयाने सात वर्षाच्या तुरुंगवासाची शिक्षा ठोठावली आहे.

### अमेरिकेत बोईंग ७३७ विमान नदीत कोसळले

**फ्लोरिडा (अमेरिका)-** अमेरिकेतील फ्लोरिडा राज्यात नदीत



बोईंग ७३७ कोसळले. विमान नदीत कोसळले त्यावेळी १३६ प्रवासी प्रवास करत होते. सेंट जॉन नदीमध्ये हे विमान कोसळले. दरम्यान, या दुर्घटनेत कोणतीही जिवीतहानी झाल्याचे वृत्त नाही. विमानातील सर्व प्रवासी सुरक्षित आहेत. बोईंग ७३७ धावपट्टीवरून शेवटच्या टप्पात घसरून नदीत कोसळले. जॅकसॉव्हिले नावल एअर स्टेशननजीक नदीत बोईंग कोसळले. अमेरिकन प्रमाणवेळेनुसार रात्री ९ वाजून ४० मिनीटांनी हा अपघात घडला. कोसळलेल्या ठिकाणी नदीच्या पाण्याची खोली कमी असल्याने सुदैवाने जीवितहानी झाली नाही.

### धक्कादायक ! सूपमध्ये निघाले रक्ताने माखलेले कापसाचे बोळे; पुण्यातील नामांकित हॉस्पिटलमधील प्रकार

**पुणे :** पोलीसनामा ऑनलाइन – पुण्यातील जहांगीर हॉस्पिटलमध्ये धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. हॉस्पिटलमध्ये उपचार घेत असलेल्या रूग्णाला देण्यात येणाऱ्या सूपमध्ये रक्ताने माखलेले कापसाचे बोळे सापडले आहेत. रुग्णाच्या नातेवाईकांनी याचा व्हिडिओ काढून हा सर्व प्रकार उजेडात आणला आहे. हे सूप हॉस्पिटलच्या कॅन्टीनमध्ये बनवण्यात आले होते. या प्रकारामुळे खळबळ उडाली आहे.



जहांगीर रुग्णालयात दाखल असलेल्या एका रुग्णाला सूप देण्यात आले होते. मात्र या सूपमध्ये रक्ताने माखलेले दोन कापसाचे बोळे सापडले. या प्रकारामुळे रुग्णाच्या नातेवाईकांनी रुग्णाला देण्यात येणाऱ्या जेवणाच्या गुणवत्तेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. याप्रकरणी रुग्णालय प्रशासनाने अद्याप कोणतीही प्रतिक्रीय दिलेली नाही. हॉस्पिटलमध्ये असलेल्या रुग्णाला सूप देण्यात आले त्यावेळी सूपमध्ये रक्ताने माखलेले कापसाचे बोळे पाहिल्यानंतर रुग्णाला धक्का बसला. त्याने आपल्या नातेवाईकांना हा प्रकार सांगितल्यानंतर नातेवाईकांनी त्याचा व्हिडिओ तयार केला. नातेवाईकांनी या सर्व प्रकाराचा व्हिडिओ करून कोरेगाव पार्क पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. या प्रकारामुळे सर्वच स्तरातून संताप व्यक्त केला जात असून याप्रकरणी पोलीस काय भूमिका घेतात हे पहावं लागेल.

# जमीनमोजणीसाठीचे ड्रोन दाखल

### ३६ हजार गावठाणांची मोजणी करणार

**पुणे - राज्यातील गावठाणांची मोजणी करण्यासाठी सर्व्हे ऑफ इंडियाकडे चाळीस ड्रोन दाखल झाले आहेत. या मोजणीच्या कामाला प्रत्यक्षात सुरू होणार असून या ड्रोनच्या माध्यमातून पुढील तीन वर्षात राज्यातील ३६ हजार गावठाणांची मोजणीचे काम पूर्ण करण्यात येणार आहे. हे काम पूर्ण झाल्यानंतर गावठाणातील रहिवाशांना आपल्या मालमत्तेची सनद मिळणार असून जागेसंदर्भातील वाद संपुष्टात येणार आहेत.**

आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने आणि गतीने जमीन मोजणीचे काम करण्याचा निणर्य भूमी अभिलेख विभागाने घेतला होता.त्यासाठी सर्व्हे ऑफ इंडियाच्या मदतीने ड्रोनचा वापर करण्याचा निर्णय घेण्यात आला. राज्यात प्रायोगिक तत्वावर हा प्रयोग पुरंदर तालुक्यातील सोनोरी या गावी राबविण्यात आला होता. तो यशस्वी झाल्यामुळे राज्यातील सर्व गावठाणांची मोजणी ड्रोनद्वारे करण्यास राज्य सरकारने मान्यता दिली होती. त्यासाठी सर्व्हे ऑफ इंडियाला ड्रोनचा वापर करण्यासाठी दोन कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला होता. राज्यात जमीन मोजणीसाठी पहिल्यांदाच ड्रोनचा वापर करण्यात आला. यामुळे सर्वसाधारणपणे पद्धतीने गावठाण मोजणी करण्यासाठी १५ ते ३० दिवस लागतात. मात्र, ड्रोनच्या सहायाने फक्त एका दिवसात मोजणीची प्रक्रिया पूर्ण करण्यात आले. हा प्रयोग यशस्वी झाल्यामुळे भूमिअभिलेख विभागाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला होता. सध्यस्थितीत जमीन मोजणीसाठी ईटीएस मशीनचा वापर करण्यात येतो. यामुळेही जमीन मोजणी लवकर होण्यास मदत होते. मात्र, आता भूमिअभिलेख विभाग त्याहीपुढे जाऊन ड्रोनच्या सहाय्याने जमिनींची मोजणी करणार आहे. त्यामुळे एका दिवसात ड्रोनच्या सहायाने तीन गावठाणांची मोजणी करणे शक्य होणार आहे.



## देशातील बेरोजगारीचा दर वाढला, सरकार पुन्हा विरोधकांच्या रडारवर

**नवी दिल्ली-** देशात बेरोजगारीचा दर सातत्याने वाढत आहे. मार्च २०१९ मध्ये देशात बेरोजगारीचा दर ६.७ टक्के इतका होता. त्यामध्ये आता वाढ होऊन एप्रिल २०१९ मध्ये भारतातील बेरोजगारीचा दर ७.६ टक्क्यांवर पोहोचला आहे. सेंटर फॉर मॉनिटरिंग इंडियन इकॉनॉमी (सीएमआयई) या संस्थेने यासंबधीची आकडेवारी जाहीर केली आहे. देशभरात असंख्य तरुणांकडे रोजगार नसल्यामुळे विरोधक सातत्याने सरकारवर टीका करत आहेत. तर सरकार मात्र ही बाब मान्य करत नाही. परंतु सीएमआयईने बेरोजगारीच्या दरासंदर्भात जाहीर केलेल्या नव्या आकडेवारीनंतर विरोधकांना सरकारवर टीका करण्यासाठी आणखी एक कारण मिळाले आहे, तर ही आकडेवारी केंद्र सरकारची डोकेदुखी वाढवणारी असल्याची चर्चा सुरु आहे. ऐन




लोकसभा निवडणुकीच्या काळात बेरोजगारीचा दर वाढल्यामुळे सध्या देशभरात सुरु असलेल्या निवडणुकीवर त्याचे परिणाम होतील असे बोलले जात आहे. १९ मेपर्यंत लोकसभा निवडणूकीसाठी मतदान सुरु असणार आहे. अद्याप तीन टप्प्यातील मतदान बाकी आहे. या तीन टप्प्यातील मतदानावर या नव्या आकडेवारीचा परिणाम होऊ शकतो, असेदेखील बोलले जात आहे. डिसेंबर २०१८ मध्ये बेरोजगारीच्या दरासंदर्भातील आकडेवारी लिक झाली होती. त्यामध्ये म्हटले होते की, वर्ष २०१७-१८ मध्ये देशात गेल्या ४५ वर्षातील सर्वाधिक बेरोजगारीची नोंद झाली आहे. तसेच त्यामध्ये म्हटले होते की, नोव्हेंबर २०१६ मध्ये नोटबंदी लागू केल्यानंतर देशभरात बेरोजगारी वाढू लागली.

## पृथ्वी थोडक्यात वाचली, हा लघुग्रह आदळण्याचा धोका टळला!

**मुंबई-** पृथ्वीवर एक मोठा लघुग्रह येण्याचा धोका टळला आहे. हा लघुग्रह पृथ्वीवर धडकणार होता. मात्र, पृथ्वीच्या पृष्ठभागापासून फक्त ३१ हजार



किलोमीटर अंतरावरून जाणार असल्याने मोठा धोका टाळला आहे. लघुग्रहापासून पृथ्वी सुरक्षित राहणार आहे. कारण हा लघुग्रह पृथ्वीवर आदळणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे. सुमारे दहा वर्षानंतर, १३ एप्रिल २०२९, या दिवशी 'अपोफिस' नावाचा ३४० मीटर आकाराचा मोठा लघुग्रह पृथ्वीवर आदळण्याची शक्यता होती. परंतु हा लघुग्रह पृथ्वीवर न आदळता पृथ्वीच्या पृष्ठभागापासून फक्त ३१ हजार किलोमीटर अंतरावरून जाणार असल्याचे खगोलशास्त्रज्ञ डॉ. रिचर्ड बिनझेल यांनी सांगितले.

'अपोफिस' विषयी खगोल अभ्यासक दा. कृ. सोमण म्हणाले, 'अपोफिस' हा लघुग्रह तीन शास्त्रज्ञांनी १९ जून २००४ रोजी अमेरिकेतील किटपीक वेधशाळेतून शोधला होता. अधिक चैत्र कृष्ण अमावास्या, शुक्रवार १३ एप्रिल २०२९ हा दिवस त्यादृष्टीने मोठट्या 'धोक्याचा दिवस' समजला जात होता.

## पालकमंत्री घेणार दुष्काळाचा आढावा, आचारसंहितेबाबत अद्याप निर्णय नाही

**मुंबई-** राज्यात बहुतांश भागात पाणीटंचाईची समस्या वाढत असून पालकमंत्र्यांना आपापल्या जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. राज्यातील लोकसभेचे मतदान पार पडल्याने आचारसंहिता शिथिल करण्याची मागणी सरकारने केली आहे. अद्याप निवडणुक आयोगाने कोणताही निर्णय घेतला नसल्याने किमान दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेण्याची प्रक्रिया सरकारने सुरू केली आहे.

यासंदर्भात गुरुवारी मंत्रिमंडळाची बैठक पार पडली. सद्य:स्थितीत राज्यात १२११६ गावांत ४७७४ टँकर्सने पाणी दिले जात आहे. तसेच साडेआठ लाख जनावरांसाठी १२६४ चारा छावण्या सुरू आहेत. तूर्तास राज्यातील ५८ हजार हेक्टर जमिनीवर चाऱ्याची उपलब्धता आहे.



दुष्काळग्रस्त भागातील ८२ लाख शेतकऱ्यांपैकी ६८ लाख शेतकऱ्यांच्या खात्यात दुष्काळी मदत जमा केल्याची माहिती सरकारने दिली आहे. उर्वरित शेतकऱ्यांच्या बँक खात्यांची छाननी पूर्ण झालेली नाही. त्यामुळे छाननीनंतर शिल्लक रक्कमही शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केली जाणार आहे. याबाबत मुख्यमंत्री म्हणाले, शासकीय उपाययोजना करण्यासाठी अडचण असली तरीही दुष्काळाचा आढावा घेण्यासाठी आचारसंहितेची अडचण नाही. त्यामुळे सर्व पालकमंत्र्यांना जिल्ह्यांचा आढावा घेण्याचे निर्देश दिले आहेत. सर्व पालकमंत्र्यांनी चारा छावण्यांना प्रत्यक्ष भेटी देऊन त्याचाही आढावा घ्यावा, पाण्याच्या टँकर्संना जीपीएस लावण्यात आले आहेत. त्यामुळे त्यांनी त्याचीही पडताळणी करण्याचे आदेश दिल्याचेही मुख्यमंत्री म्हणाले.

## या देशांमध्ये आहेत सोन्याचे अवाढव्य साठे

सोनेखरेदीचे महत्व हा प्रत्येक भारतीय स्त्रीच्या जिव्हाळ्याचा विषय आहे. किंबहुना जगातील अकरा टक्के सोन्याचा साठा हा भारतीय गृहिणींकडे असल्याचे म्हटले जाते ! समस्त जगामध्ये भारतीय लोक सर्वाधिक सोने खरेदी करणारे समजले जातात. पण केवळ लोक किती सोने खरेदी करतात यावर नाही, तर त्या त्या देशांच्या रिझर्व्ह बँकांमध्ये सोन्याचा सरकारी अधिकृत साठा किती मोठा आहे, यावर त्या देशाची अर्थव्यवस्था किती मजबूत आहे, हे अवलंबून असते. पण भारतामध्ये मात्र रिझर्व्ह बँकेमध्ये नसेल इतके सोने भारताच्या जनतेकडे असल्याचे म्हटले जाते !

सोन्याचा सर्वाधिक साठा असणाऱ्या देशांमध्ये अमेरिका प्रथम स्थानी आहे. जगातील सर्वाधिक सोन्याचा साठा या देशाच्या संग्रही आहे. वर्ल्ड गोल्ड कौन्सिलच्या अनुसार अमेरिकेच्या संग्रही ८,१३३ टन सोने आहे. अमेरिकेनंतर सर्वाधिक सोन्याचा साठा असलेल्या देशांमध्ये जर्मनी दुसऱ्या स्थानावर आहे. या देशाच्या संग्रही ३,३८१ टन सोने आहे. समस्त युरोपीय देशांमध्ये सर्वाधिक सोन्याचा साठा असणारा जर्मनी हा देश आहे. सोन्याचा सर्वाधिक साठा असणाऱ्या देशांच्या यादीमध्ये इटली या देशाचा समवेश असून या देशाच्या संग्रही २,४५२ टन सोने आहे. जगातील चौशष्ट टक्के सोने इटली देशाकडे आहे. त्यानंतर यादीमध्ये फ्रांसचा समावेश असून, या देशाकडे २,४३६ टन सोने आहे.

## पिंपरी येथे दाताच्या शस्त्रक्रियेदरम्यान १९ वर्षीय तरुणीचा मृत्यू; रुग्णालय प्रशासनाने जबाबदारी नाकारली

दातांची शस्त्रक्रिया सुरु असताना अतिरक्तस्त्राव झाल्याने एका तरुणीचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना पिंपरी (Pimpari) येथे घडली आहे. धनश्री जाधव असं या मृत मुलीचं नाव असून ती १९ वर्षांची होती. या प्रकरणात शस्त्रक्रिया करणारे डॉक्टर पाटील दाम्पत्य संध्या संपर्कात नाहीत. डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे मुलीला प्राण गमवावे लागले असल्याचे आरोप नातेवाईकांनी केले आहेत.

धनश्रीला दातांमध्ये जन्मजात दोष (Crouzon's Syndrome) होता. त्यावर पिंपरी चिंचवड येथील आयुर्वेद स्टर्लिंग हॉस्पिटलचे डॉक्टर राम पाटील आणि अनुजा पाटील यांनी शस्त्रक्रिया करुन दोष दूर करणार असल्याचे सांगितले. त्यासाठी धनश्रीवर २३ एप्रिल रोजी शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला. दुपारी १२ वाजता शस्त्रक्रिया सुरु झाली. मात्र १२ तास झाले तरी शस्त्रक्रिया सुरुच होती. दरम्यान तिच्या नाका-तोंडातून अतिरक्तस्त्राव सुरु झाला आणि तिला आयसीयूत दाखल करावे लागले. आयसीयूत उपचार सुरु असताना रक्तदाब कमी झालं आणि ब्रेन डेड झालं. अखेर २४ एप्रिल सकाळी धनश्रीने प्राण सोडले. या सर्व प्रकरणानंतर रुग्णालय प्रशासनाने दंत विभाग सील केला असून डॉ. पाटील दाम्पत्याला हे चिकित्सालय रुग्णालयाने भाडे तत्वावर दिलं असल्याची माहिती आहे. त्यामुळे भाडे कराराशिवाय पाटील दाम्पत्याचा आणि आमचा संबंध नसल्याचे रुग्णालय प्रशासनाने म्हटले आहे.

## निवडणूक आयोगाचा दणका; राज ठाकरेंना सादर करावा लागणार प्रचारसभांचा खर्च, आयोगाची माहिती

**मुंबई-** 'ए लाव रे तो व्हिडिओ...' म्हणत मनसे पक्षप्रमुख राज ठाकरे यांनी लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज्यभरात ठिकठिकाणी प्रचार सभा घेतल्या होत्या. व्हिडिओद्वारे त्यांनी भाजपची पोलखोल केली होती. पण



या सभांचा खर्च कोण करत आहे असा प्रश्न सत्ताधाऱ्यांनी विचारला होता. यावरून मोठे राजकारण केले जात होते. त्यातच आता निवडणूक आयोगाने दिलेल्या माहितीनुसार या प्रचारसभांचा खर्च मनसेला सादर करावा लागणार आहे. याबाबत भाजपने आक्षेप नोंदवला होता. राज्याचे शिक्षणमंत्री विनोद तावडे यांनी निवडणूक आयोगाला याबाबत पत्र लिहिले होते. त्यानंतर निवडणूक आयोगाने राज ठाकरेंना प्रचार सभांचा खर्च सादर करावा लागणार असल्याची माहिती दिली आहे. राज्याचे अतिरिक्त निवडणूक अधिकारी दिलीप शिंदे यांनी ही माहिती दिली आहे. राज ठाकरे स्वत: किंवा त्यांच्या पक्षाचा कोणताही उमेदवार निवडणूक लढवत नसताना ते कोणासाठी प्रचारसभा घेत आहेत, असा प्रश्न सत्ताधाऱ्यांकडून उपस्थित करण्यात आला होता. या प्रचारसभांचा खर्च कोणत्या उमेदवाराच्या खर्चामध्ये दाखवायचा, अशी विचारणादेखील पत्रातून निवडणूक आयोगाकडे करण्यात आली होती.

# अवघा महाराष्ट्र दुष्काळाच्या खाईत!

**मुंबई - दुष्काळ आणि पाणीटंचाईचे सावट दूर करण्यासाठी राज्य सरकारने सत्तेवर आल्यानंतर 'जलयुक्त शिवार'चा अभिनव कार्यक्रम राबवण्यास सुरवात केली. मात्र तरीही राज्यात आजमितीस पाणीबाणी जाहीर झाली असून, राज्यातील गावागावांत नागरिकांना तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे अवघा महाराष्ट्र दुष्काळाच्या खाईत सापडल्याचे चित्र निर्माण झाले आहे.**

राज्यात सतत उद्‌भवणारी टंचाईची परिस्थिती विचारात घेऊन 'सर्वांसाठी पाणी टंचाईमुक्त महाराष्ट्र- २०१९' अंतर्गत जलयुक्त शिवार अभियान राज्य सरकारने हाती घेतले. २०१४-१५ मध्ये भूजल पातळीत दोन मीटरपेक्षा जास्त घट झालेल्या १८८ तालुक्यांतील दोन हजार २३४ गावांमध्ये, तसेच सरकारने टंचाई परिस्थिती जाहीर केलेल्या २२ जिल्ह्यांतील १९ हजार ५९ गावांमध्ये हे अभियान प्राधान्याने राबविण्यात येत आहे. भविष्यात राज्याच्या उर्वरित भागात पाणीटंचाई निर्माण होऊ नये, यासाठी उपाययोजना करण्यावरही भर दिला आहे.




हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं.३-४, अमीन इंडस्ट्रियल इस्टेट, सोनावला क्रॉस रोड नं.४, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३ येथे छापून २, राजाराम को.ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - ४०१ १०५ येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत)